The Resource Centre

Prahaar

**Date:** 11/12/2010 **Page No:** 1 **Location:** Suppliment **Circulation:** 0

**Edition:** Mumbai

**Madhuri Jhalak**



# माधुरीची झलक

सोनी वाहिनीवर 'कौन बनेगा करोडपती'च्या जागी येणाऱ्या 'झलक दिखला जा' या कार्यक्रमाचे यावेळचे मुख्य आकर्षण असणार आहे माधुरी दीक्षित. ती या कार्यक्रमातून परीक्षक म्हणून प्रथमच छोट्या पडद्यावर दर्शन देणार आहे. सोनी वाहिनीने दोन वर्षं केलेल्या पाठपुराव्यामुळेच हा कार्यक्रम स्वीकारायला तयार झाल्याचं माधुरी सांगते. तिच्या बरोबर परीक्षक म्हणून रेमो आणि मलायका अरोरा खानही असणार आहेत. या वेळेसच्या 'झलक दिखला जा'मधून अनेक सेलिब्रिटी आपल्या नृत्याचे कौशल्य आजमावणार आहेत. शेखर सुमन, रेणुका शहाणे, रागिणी खन्ना, सुशांत सिंग, अंकिता लोखंडे, मयांग चँग, अनुष्का मनचंदानी, बॉक्सर अखिल कुमार, याना गुप्ता, कृष्णा अभिषेक आणि माही विज हे कलाकार या पर्वात चमकणार आहेत.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुमीत राघवन आणि मोना सिंग करणार आहेत. येत्या १३ डिसेंबर पासून सोमवार व मंगळवारी रात्री ९ वाजता हा कार्यक्रम प्रसारित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमातला १२ वा प्रतिस्पर्धी कोण असणार हे मात्र अद्याप गुलदस्त्यात असून पहिल्या भागात त्याची घोषणा करण्यात येणार आहे. 'झलक दिखला जा'ने आणखी एक नवा पायंडा पाडायचं ठरवलं असून या कार्यक्रमाच्या प्रिमिअरचे प्रसारण रविवारी रात्री ९ वाजता करण्यात येणार आहे.

Copyright of the article is with the publication